# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. 2020/प्र.क्र. 31/18 (र.व.का.) दि. 16 मार्च 2020.
4. या कार्यालयाचे पत्र क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 18.03.2020.
5. या कार्यालयाचे पत्र क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 20.03.2020.
6. प्रबंधक जिल्हा अग्रणी बँक, उस्मानाबाद यांचे पत्र क्र. एलडीएम/ओएसडी/20-21/001 दि. 01.04.2020.
7. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-1(a) दि. 24.03.2020.
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 25.03.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांक:- 02/04/2020.

**विषय:- करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव होऊ याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उस्मानाबाद जिल्हयामधील सर्व सरकारी, सहकारी व खाजगी बँका, पतसंस्थांमध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव होऊ याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व सरकारी, सहकारी व खाजगी बँका, पतसंस्था व त्यांचे ATM केंद्रांमध्ये



Scanned by CamScanner

दि. 31 मार्च 2020 पर्यंत करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भ क्र. 4 व 5 अन्वये आदेश पारित केलेले आहेत. ज्याअर्थी संदर्भ क्र. 7 अन्वये दि. 14 एप्रिल 2020 पर्यंत संपूर्ण भारत देशभर लॉकडाऊनचे आदेश भारत सरकारने पारित केलेले आहेत. संदर्भ क्र. 8 ,अन्वये महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. 7 चे आदेशाची अंमलबजावणी करणेसाठी सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्ह्यामधील सर्व सरकारी, सहकारी व खाजगी बँका, पतसंस्था व त्यांचे ATM केंद्रांमध्ये करावयाची संदर्भ क्र. 4 व 5 चे आदेशातील नमूद कार्यवाही दि. 14 एप्रिल 2020 पर्यंत चालू ठेवणेबाबत आदेशित करीत आहे.**

या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन दैनंदिन अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद व प्रबंधक, जिल्हा अग्रणी बँक, उस्मानाबाद यांना आदेशित करीत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
4. प्रबंधक, जिल्हा अग्रणी बँक, उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner